Vol 5 Issue 5 Nov 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

**Golden Research Thoughts**
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 5 | Nov - 2015

GRT

# भटक्या विमुक्तांची कादंबरी – अस्तित्वासाठीचा संघर्ष

*राजकुमार किशनराव यल्लावाड*
*कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी–वै. जि. बीड .*



राजकुमार किशनराव यल्लावाड

***सारांश :***

मराठी साहित्यामध्ये स्वातंत्र्यत्तोर कालखंडामध्ये अनेक साहित्यप्रवाह निर्माण झाले खऱ्या अर्थाने साहित्याला सर्वसामान्य माणसाचा चेहरा प्राप्त झाला फक्त आशयाबाबात नाही तर भाषा, विषय, प्रदेश, बोली रचनातंत्र अशा विविध घटकांनी त्या त्या साहित्य प्रवाहाची दिशा निश्चित केली. याच साहित्य प्रवाहांनी मराठी साहित्याला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली. त्यात प्रामुख्याने दलित, स्त्री, ग्रामीण व आदिवासी साहित्य प्रवाहाची नेहमी चर्चा होतांना आढळते मात्र भटक्या विमुक्तांच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीच्या अंगाने तसेच जातबहिष्कृत पणाला भिक न घलता जेव्हा हा वंचित, मागास, अज्ञानी भटका समूह अभिव्यक्त होऊ लागला तेव्हा समाज, अभ्यासक, विचारवंत व वाचकही भांबावून गेला. एका अनोख्या अज्ञात सामाजजीवनामुळे मराठी साहित्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली लक्ष्मण माने (उपरा), लक्ष्मण गायकवाड (उचल्या), भीमराव गस्ती (बेरड) किशोर काळे (कोल्हाटयांच पोर) संतोष पवार (चिरा) सौ. जनाबाई गिऱ्हे (मरणकळा) आदीच्या आत्म कथनामुळे मराठी साहित्याला समृध्दता आणि नवा आयाम प्राप्त झाला.



***प्रस्तावना :***

मात्र मराठी साहित्याने ज्याप्रमाणे भटक्यांच्या आत्मकथनांची दखल घेतली त्याप्रमाणे भटक्या विमुक्तांच्या कांदबऱ्यांची दखल घेतली नाही. अशोक पवार (इळनमाळ, दर कोस दर मुक्काम) प्रा. प्रकाश जाधव (तिम्मा) संतोष पवार (मोहतराचा नवरा) रावजी राठोड (गोठण) किशोर काळे (चिरा) दादासाहेब मोरे (अंधाराचे वारसदार) आदी महत्त्वपूर्ण कांदबऱ्यांचा उल्लेख करता येईल. ह्या कलाकृती म्हणजे त्या त्या जाती जमातीचा सामाजिक दस्ताऐवज ठरतात. यातील अनेक कांदबऱ्यांना विविध पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. भटक्या विमुक्ताच्या साहित्याचा आढावा घेण्या अगोदर समूह जीवनाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

***प्रस्तुत विषयाचे महत्त्व :***

भारतीय समाजव्यवस्था ही प्रामुख्याने तीन गटात विभागली आहे. शहरी, ग्रामीण व आदिवासी त्याचबरोबर आधुनिक काळामध्ये ह्या समाजसमूहाचा विकास झाला आहे. एका गावात राहणारा ग्रामीण समुदाय, तर गावकुसाच्या बाहेर परंतु गावकुसामध्ये स्थान असणारा दलित, अस्पृश्य समाज, तर जंगल हेच सर्वस्व मानत राहणारा आदिवासी समूदाय होय. मात्र चौथा समाजसमूह म्हणून ज्यांची नोंद नाही वरील तिन्ही समाज व्यवस्थेमध्ये स्थान नसणारा, एका जागी स्थानबध्द नसलेला सतत पोटासाठी भटकंती करणारा भटका विमुक्त समाज आहे. भटक्या विमुक्त जाती जमातीचा 'एक माणूस' म्हणून कधीच विचार करण्यात आला नाही. 1871 साली ब्रिटीशांनी गुन्हेगारी कायदा करुन ह्या भटक्या जाती जमातीला जन्मजात गुन्हेगार चोर ठरवित त्यांचे जीवन बंदिस्त केले. सेटलमेंट कायदा पास करण्यात आला. ह्या कायद्याचा कागदोपत्री 1952 ला बीमोड करण्यात आला असला तरी आजही पोलीस प्रशासन व प्रस्थापीत समाजव्यवस्था ह्या समूहाचा स्वीकार न करता चोर गुन्हेगार ठरविले.

'वतनदारांला एक गांव तर भिकाऱ्याला तीस गाव' ह्या स्थितीमध्ये हा समूह आज ही पोटाच्या खळगी साठी भटकंती करत आहे. अज्ञान, दारिद्र्य, उपासमारी, अंधश्रध्दा, रुढी परंपरा, व्यसना- धिनता उदरनिर्वाहाच्या पारंपरिक साधनांचा ऱ्हास आदीच्या चक्रव्यूहात हा समूह खितपत पडला आहे. सांगायला गांव नाही राहायला घर नाही जीवन चरितार्थाचे साधन नाही. पोटाच्या खळगीसाठी भीक मागणे, शिकार

करणे व विकणे. लहान मोठया चोऱ्या करणे त्याचबरोबर पोटासाठी रानोमाळ भटकणारा हा समाज. प्रशासन व समाजाचे संपूर्णपणे दुर्लक्ष आज ही आढळते. पोटासाठी चोरी आणि भटकंती अशी भटक्या समूहाची स्वतंत्र ओळखही निर्माण झाली आहे. आपल्या वाट्याला आलेला दुःखभोग निमुटपणे सहन करत शेवटी नशिबाला दोष देऊन पुन्हा पोटासाठी भटकंती करणाऱ्या अशा ह्या भटक्या विमुक्त जाती जमाती सर्वत्र विखुरलेल्या विकास, प्रगती व भारतीय महसत्ता पासून कोसो मैल दूर आहेत. त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम साहित्याच्या माध्यमातून झाले असे म्हणता येईल. त्या समाजाला न्याय मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून या विषयाचे विशेष महत्त्व आहे.

### *भटक्या विमुक्ताचे साहित्य :*

अस्थिर असुरक्षित सातत्याने पोटासाठी भटकंती करणारा भटका समूह होय. अक्षर ओळख नसल्यामुळे मौखिक स्वरुपामध्ये संस्कृती व लोककथागीते यांची परंपरा ह्या समूहाने जोपासली आहे. ह्यातील काही जाती जमाती ह्या लोसंस्कृतीचे वाहक ठरतात. वासुदेव, गोंधळी पोतराज, पांगूळ, मसणजोगी, कुडमुडे जोशी ह्या जाती जमाती लोकसंस्कृतीचे उपासक आहेत. अन्य जाती जमातीमध्येही मोठ्या प्रमाणत लोकसाहित्याची निर्मिती अलीकडील काळामध्ये लिखित स्वरुपात प्राप्त झाली आहे. यातून अनेक बाबीचा उलगडा होत जातो.1960 नंतर दलित साहित्य प्रवाहाने तळागाळातील वंचित मागास गटापर्यंत परिवर्तनवादी विचार व महापुरुषाचे तत्त्वज्ञान पोहचवले. त्यामुळे अनेक समूहाला नवसंजीवनी प्राप्त झाली. आपल्या मोडक्या तोडक्या अनुभवांना साहित्यातून शब्दबध्द करण्यास सुरुवात झाली. याला भटका समाज ही अपवाद नाही. भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनांमुळे एक स्वतंत्र ओळख निर्माण झाली; नव्हे तर मराठी साहित्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिमा प्राप्त झाली. कविता साहित्य प्रकारात डॉ. वीरा राठोड यांच्या कवितेची दखल साहित्य अकादमी नवी दिल्लीने घेऊन युवा साहित्य आकादमीचा पुरस्कार दिला आहे. त्याचबरोबर पी. विठ्ठल, दामोदर मोरे, प्रा. सुषमा अंधारे, अरुण पवार आदी कवीचा उल्लेख करता येईल. कथा, नाटक याबाबत अजून ही दमदार लिखाण होतांना आढळता नाही, आसाराम गुरुजी, बाळकृष्ण रेणके, मोतीराज राठोड, दादासाहेब मोरे, डॉ. रमेश जाधव, भीमराव गस्ती आदी वैचारिक साहित्यातील सामाजिक चळवळींतील कार्यकर्त्यांची फळी आढळते. साहित्य चळवळ व सामाजिक परिवर्तन चळवळ ह्या भटक्या विमुतांच्या साहित्य चळवळीबाबत सहप्रवासी आढळून येतात. प्रस्थापित समाजव्यवस्था व स्वतंत्र भारतामध्ये आमचा माणूस म्हणून विचार व्हावा व जगू द्यावे अशी भूमिका चळवळीतील कार्यकर्ते व लेखक घेतांना आढळतात.

### *भटक्या विमुक्तांची कांदबरी*

1960 नंतरच्या साहित्यकृती भटक्या विमुक्त जाती जमातीच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. मग भटकंती दरम्यानची होरपळ, गुन्हेगारी कायदा, जीवन जगण्यासाठी करावा लागणारा वेदनामय संघर्ष, जातपंचायतीचे अस्तित्व प्रस्थापित समाज व प्रशासनाने नाकारलेला समूह अशा जीवन जगण्यातील विविध जाणिवा ह्या इतरांच्या कांदबरी लिखाणतून येतांना आढळत नाहीत. विभावरी शिरुरकर, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, श्री.म. माटे, रणजित देसाई, आदीने तसे प्रयत्न केले आहेत. दलित कादंबरीपेक्षा भटक्या विमुक्तांची कादंबरी ही जीवन जगण्याच्या विविध जाणिवांच्या पातळीवर भिन्न ठरते. दलित कांदबरी ही अस्मितेसाठी संघर्ष करते तर भटक्या विमुक्तांची कादंबरी ही अस्तित्वासाठी संघर्ष करते. असे स्पष्टपणे आढळून येते. इळनमाळ, पडझड, दरकोस दर मुक्काम वडारवेदना, वकिल्या पारधी, दुष्काळ अंधाराचे वारसदार, मोहतराचा नवरा, तिम्मा, तीन भिंती, चिरा आदी महत्त्वपूर्ण कांदबऱ्याचा उल्लेख करता येईल.

भटक्या विमुक्तांच्या चळवळीला पोषक म्हणून चळवळीतील कार्यकर्त्यांनी जाणिवपूर्वक साहित्यनिर्मिती केली आहे. यामुळे त्यांचे प्रश्न जीवनमान संस्कृती ही समाज प्रशासन व सामाजिक कार्यकर्त्यांपुढे आली. घटना प्रसंगातील वास्तवता व स्वनुभवाची असलेली झालर आढळते. त्यांच्या अभिव्यक्तीतून आम्हाला काहीतरी सांगण्याच्या हेतूने निर्मिती झाली आहे. या विषयी डॉ. ना.धों. कदम म्हणतात.

> ''आम्हाला माणूस म्हणून जगू द्या आणि जगा हेच त्यांच्या अभिव्यक्तीचे खरेखुरे स्वरुप म्हणावे लागेल'' [1]

यांची प्रचिती एकंदरीत भटक्या विमुक्तांच्या कादंबऱ्यामधून येतांना आढळते.

### *इळनमाळ :*

अशोक पवार यांची ही कांदबरी बेलदार जाती समूहाचे वास्तवदर्शी चित्रण करते. इळनमाळ म्हणजे नेहमी भटकणारे लोक असा शब्दाचा अर्थ होतो. आयुष्यभर पाल, बिराड व भटकंती, दारिद्रय, अज्ञान उपासमारी काहीमुळे आयुष्याची होणारी परवड ह्या कांदबरीमध्ये चित्रित झाली आहे. गुन्हेगारी कायद्यामुळे होणारी पिळवणूक, स्त्रीवर होणारे अन्याय अत्याचार, पोटाच्या खळगीसाठी स्वंतत्र भारतामध्ये ही टोकाचा संघर्ष करावा लागतो तेव्हा लोकशाही, समता, स्वातंत्र्य हे शब्द किती घाणेरडे वाटतात. आमचा आणि जगाचा काहीच संबंध नाही. ह्या जगात आमचे स्थान किती पोकळ आहे ह्या अस्तित्वाची जाणीव ही कादंबरी करुन देते.

### *• पडझड*

भटक्या विमुक्त जाती जमातीची अनेक कारणामुळे होणारी पडझड अशोक पवार यांनी चित्रित केली आहे. ही बीन चेहऱ्याची माणस शिक्षण घेऊन अस्तित्वासाठी संघर्ष करतात तेव्हा भ्रष्टाचार वशिला व पैशापुढे याचा निभाव लागत नाही उच्च शिक्षाण घेऊनही ह्या तरुणांना व्यवस्थेचा घटक न होता प्रस्थापित समाज प्रशासन त्यांना जन्मजात गुन्हेगार, चोर समजते त्यामुळे जीवनाला कवडीमोल किंमत प्राप्त होते. आतापर्यंत ह्या समूहाची जणगणनाही योग्य प्रमाणत करण्यात आली नाही. त्यांना माणूसपण प्राप्त होऊन आयुष्याची होत जाणारी पडझड थांबवावी यासाठी ही कादंबरी प्रयत्न करते.

### *• दर कोस दर मुक्काम*

शिकार करणे, विकणे व जंगल संवर्धनामुळे कित्येक भटक्या विमुक्तांचे जीवन उध्वस्त झाले आहे. त्यांचबरोबर गुन्हेगारी

कायद्यामुळे दर कोसा सोबत दर मुक्कामावर होणरी पिळवणूक स्पष्ट केली आहे. जन्मजात गुन्हेगार चोर ठरवून एका एका माणसावर अनेक प्रकाराचे गुन्हे आढळतात. लहान मुले मुली यातून सुटत नाहीत. वसतिगृहामध्ये राहून शिक्षण घेणाऱ्या अल्प वयातील कमलाला पोलिस स्टेशनमध्ये अन्याय–अत्याचार केले जातात प्राप्त परिस्थिती आर्थिक दारिद्र्य व पोटाच्या खळगीसाठी अवैध मार्ग व लहान मोठ्या चोऱ्या कारणारा हा समूह आढळतो. वास्तवदर्शी व कमालीचे अज्ञान विश्व अशेक पवार यांनी या कादंबरीतून उभे केले आहे.

**• मोहतराचा नवरा :**

पोटच्या मुलीचे पैशासाठी बोली स्वरुपामध्ये लिलाव करणरा बाप, आणि चोऱ्या करुन बोली बोलणारे वर, त्यांचबरोबर अल्पवयामध्ये येणारे मातृत्व, कुटुंबाची जबाबदारी आणि अनेक जणासोबत लावले जाणारे मोहतर आदीचा उलगडा संतोष पवार यांनी ह्या कांदबरीतून अभिव्यक्त केला आहे. मुलगी म्हणजे पैसे कमविण्याचे साधन ठरते. याचबरोबर जातपंचायत गुन्हेगारी कायद्यामुळे होणारी होरपळ, पारधी समूहाचे अज्ञान, दारिद्र्याची जाणीव यातून होते. शारीरिक भुकेपेक्षा पोटाची भूक ही अत्यंत महत्त्वाची मानून काही ठिकाणी अवैध्य वळण घेतानाही आढळते. अशा अनेक बाबींवर प्रकाश टाकण्याचे कार्य ही कांदबरी करते.

**• वकिल्या पारधी**

पारधी समूहाच्या अंगाला  पोलीस कायमचे गोचिडासारखे चिकटले आहेत. गुन्हा असो वा नसो गुन्हेगार मात्र हा भटका समूह ठरलेला आहे. ब्रिटीश सत्तेला आव्हान देऊन संघर्ष करणारा भटका समूह स्वतंत्र भरतामध्ये चोर ठरतो. तर भटक्या समूहाच्या मदतीने स्वार्थ साधणारे मतलबी लोक स्वातंत्र्यसैनिक ठरतात. ह्या अजब प्रवृत्तीचा शोध लक्ष्मण गायकवाड यांची वकिल्या ही कांदबरी घेते. पारधी गुन्हेगाराला पकडले तर पदोन्नती ही निश्चित आहे. 1971 च्या गुन्हेगारी कायद्यांचे पालन आज ही करुन अनेक घटना ह्या माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घडतात. हिंदू वकिल्या पारधीचा प्रवास पोलीस, प्रस्थपित व्यवस्थेच्या त्रासाला कंटाळून वकिल गोन्सन्हिस ह्या ख्रिश्चन धर्मापर्यंत जातो. पोटाची खळगी व आम्हाला माणूस म्हणून जगू द्या असा आर्त टाहो ही कांदबरी फोडते.

**• वडारवेदना**

चळवळीतील साक्रिय कायकर्ते लक्ष्मण गायकवाड यांनी 'वडारवेदना' कांदबरीतून वडार जाती अंतर्गत असणरी संस्कृती समज–गैरसमज रुढी परंपरामुळे होणारी पिळवणूक आणि तूकाराम ह्या तरुणाचा संघर्षमय प्रवास ही कांदबरी चित्रित करते जाती–जमाती अंतर्गत असणारी जाती श्रेष्ठत्वाची भावना, रोटी–बेटी व्यवहार यावरही प्रकाश टाकला आहे. सत्ता आणि संपत्तीमुळे संपुष्ट येणारे नातेसंबंध व पांढरपेशीकरणावर ही कादंबरी प्रकाश टाकते.

**• अंधाराचे वारसदार :**

भटक्या–विमुक्त जाती–जमाती ह्या उदरनिर्वाह व पोलीस प्रशासन प्रस्थापित समाजाला कंटाळून शहरामध्ये स्थायिक होण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा अस्थिर असुरक्षित, बकाल, आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या वस्तीमध्ये दाखल होतात. शहरात कचरा गोळा करणे. भीक मागणे, अवैध धंदे करणे हेच नशिबाला येते. चोर म्हणून त्यांना कोणी काम देत नाहीत. स्वार्थी व मतलबी राजकीय प्रवृत्तीचे दर्शन पोटाच्या खळगीसाठी वेश्या व्यवसायाचा आश्रय घेतला जातो आदी विषय दादासाहेब मोरे यांनी प्रस्तुत कांदबरी मध्ये हाताळले आहेत.

**• दुष्काळ**

1972–73 च्या दुष्काळातील अन्न–पाण्याशिवाय मरण जवळ करणाऱ्या अनेक भटक्या कुटूंबांची व्यथा त्यांनी मांडली आहे. दादासाहेब मोरे यांनी वास्तव परिस्थितीचा आढावा या कादंबरीमध्ये घेतला आहे.

**• गोढण**

रावजी राठोड यांनी तांडा व बंजारा संस्कृती राजकारण, विकास प्रबोधन, कौटुंबिक परवड यादी आदी बाबींचा उलगडा प्रस्तुत कादंबरीतून केला आहे.

**• तीन भिंती**

भटक्या विमुक्तांतील तरुण उच्च शिक्षण घेऊन पात्रता असतांना प्रस्थापित समाज शिक्षण व्यवस्था, राजकारण पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून स्वीकार करत नाहीत. स्वार्थी व जातीय संघटना, विद्यार्थी व प्राध्यापकाचे अनैतिक संबंध, नीतीभ्रष्टता आदीवर ही कादंबरी प्रकाश टाकतो महाराष्ट्र खानदेश या विभगातील वृत्ती प्रवृत्तीचा शोध त्यात घेतला आहे.

**• तिम्मा**

वडारसमूहमनाच्या वेदनामय भटकंतीचा प्रवास म्हणजे 'तिम्मा' ही प्रकाश जाधवांची कांदबरी होय. पोटाच्या खळगीसाठी आहोरात्र कष्ट करत अन्याय अत्याचार निमुटपणे सहन करतो दलित व अस्पृश्या पेक्षा आपण श्रेष्ठ आहोत त्याच्यात रोटी व्यवहार होत नाही अशी जातश्रेष्ठत्वाची भावना आढळून येते.

**• चिरा**

चिरा म्हणजे मुलगी वयात आल्यानंतर बोली स्वरुपामध्ये लिलाव करुन जो जास्त बोली बोलतो त्या व्यक्तीला एका रात्रीसाठी तिच्या शरीराचा उपभोग घेण्यासाठी ही पद्धती आहे. त्यावर किशोर काळे यांनी प्रकाश टाकला आहे. त्यांच बरोबर कोल्हाटी समाजाअंतर्गत

असणाऱ्या अनेक खुळचट कल्पनावरही या कादंबरीतून प्रकाश टाकला आहे.

उपनिर्देशित महत्त्वपूर्ण कादंबऱ्यामधून वेगवेगळे प्रश्न व समस्यावर प्रकाश टाकला आहे. पोटाच्या खळगीसाठी भटकणारा व गुन्हेगारी कायद्यातून होणारी कोंडमारी, भटकंती दरम्यानची होरपळ असा हा वेदनामय प्रवासाचा उलगडा अनेक कादंबऱ्यामधून होतो.

भटका समूह अनेक बाबतीत भरडला जात आहे भटक्या स्त्रीची दुहेरी पिळवणूक होते. स्वसमाज व जातपंचायत तिला अधिकच नेस्तनाबूत करत आहे तर दुसरीकडे नीतीभ्रष्ट पोलीस व गावगुंड यांच्या वासनांध नजरा तिचा चोळामोळा करत आहेत. माणुसकीलाही काळिमा फासणाऱ्या अनेक घटना स्वतंत्र भारतामध्ये होत आहेत.

अशा कित्येक घटना ह्या भटक्या विमुक्तांच्या वाट्याला येतात. पोलीस रक्षक हेच समूहासाठी मारक ठरत आहेत अशा अनेक स्त्री प्रश्नांची उकल कादंबऱ्यामधून होते. जातपंचायतीचे स्वतंत्र अस्तित्व ह्याच्या नियमातील जाचकतेमुळे कित्येक कुटुंबाची राखरांगोळी झाली आहे. एक माणूस म्हणून विचार व्हावा असा संदेश देत अनेक प्रश्नांची उजळणी कादंबऱ्यामधून होते सध्या स्थितीमध्ये भटक्या विमुक्त जाती जमातीसमोर जीवन जगण्याचे मोठे आव्हान आहे. याविषयी रेणके म्हणतात.

''भटक्या विमुक्त जाती जमातीतील लोकांचे उपजीविकेचे परंपरागत साधनच नष्ट झाल्यामुळे आज ह्या जाती जमातीतील महिला वेश्याव्यवसायात ढकलल्या गेलेल्या आहेत. भटक्या विमुक्तांच्या वेश्या महिलांची संख्या 20 हजार आहे राजस्थान, गुजरात ही राज्ये त्यापाठोपाठ आहेत. उपजीविकेची परंपरागत साधने नष्ट झाल्यामुळे आणि नवीन साधनांची निर्मिती न झाल्यामुळे ही परिस्थिती आली आहे. तिरस्काराचा विषय ठरलेल्या मुंबईतील बारबालापैकी 90% बारबाला या भटक्या विमुक्त जाती जमातीतील आहेत.''

असा अभ्यासा अंती निष्कर्ष बाळकृष्ण रेणके आयोग यांनी काढला आहे यावर त्यांची स्थिती किती स्फोटक आहे याचा अंदाज येतो.

एकूणच भटका समूह स्वातंत्र्याच्या 68 वर्षानंतरही अंधारातून वाट काढण्याची वाटचाल करत आहे. कादंबरी विश्वातून संबंधीत प्रश्न व अंतर्गत बाबीचा उलगडा होत जातो. पालसंस्कृती भटकंती दरम्यानची होरपळ, गुन्हेगारी प्रवृत्ती, जापंचायतीचे अस्तित्व, असुरक्षित, अस्थिर स्त्री जगतांचा आढावा ही कादंबरी घेते. जे जीवन जगले, अनुभवले पाहिलेले आहे त्यांची स्वअनुभवाची वास्तवता ह्या कादंबऱ्यामधून अभिव्यक्त होत गेली आहे त्यातून लेखकाला भूतकाळातील वेदनामय प्रवासाची उजळणी करावी लागली आहे. त्या त्या घटना प्रसंगाचा तो प्रत्यक्ष साक्षीदार आहे. फक्त प्रश्न घेऊन ही कादंबरी येत नाही तर जीवनाबद्दल आशावादही व्यक्त करते. अन्य कादंबरीपेक्षा भटक्या विमुक्ताची कादंबरी जाणिवेच्या पातळीवर भिन्न ठरते. स्वतंत्र बोली भाषा व संस्कृती परिचय हा मराठी साहित्याला झाला आहे. स्वतंत्र अस्तित्व व ओळखीसाठी ही कादंबरी आपली दमदार वाटचाल करत मराठी कादंबरीला नव्या वळणावर आणण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पुढील काळामध्ये भटक्या विमुक्तांची कादंबरी निश्चित करणार आहे.

### निष्कर्ष

1. भटक्या विमुक्तांचा वेदनामय जीवनप्रवास वास्तव स्वरुपात या कादंबऱ्यातून व्यक्त झाला आहे.
2. 'माणूस' म्हणून जीवन जगता यावे. ही जाणीव त्यातून प्रकर्षाने पुढे येते.
3. जीवनातील केवळ प्रश्नच ही कादंबरी मांडत नाही. तर जीवनाबद्दल आशावाद व्यक्त करते.
4. स्वतंत्र बोली भाषा व भटक्यांच्या संस्कृतीचा परिचय मराठी साहित्याला या कादंबरीमुळे झाला.

### संदर्भ ग्रंथ


| | |
|---|---|
| ना.धों. कदम | (महाराष्ट्रातील भटका समाज, संस्कृती साहित्य) |
| अशोक पवार | पडझड |
| बाळकृष्ण रेणके | दै. लोकमत संपादकीय (त्यांना हवंय राजधर्म) |
| रामनाथ चव्हाण | जाती जमातीचे अंतरंग |

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- ✍ EBSCO
- ✍ Index Copernicus
- ✍ Publication Index
- ✍ Academic Journal Database
- ✍ Contemporary Research Index
- ✍ Academic Paper Databse
- ✍ Digital Journals Database
- ✍ Current Index to Scholarly Journals
- ✍ Elite Scientific Journal Archive
- ✍ Directory Of Academic Resources
- ✍ Scholar Journal Index
- ✍ Recent Science Index
- ✍ Scientific Resources Database
- ✍ Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org